# माझं घर जळालं आहे; त्यात मराठा आंदोलकांचा संबंध नाही, भुजबळांनी...

# पोलिसांचाही याच्यात दोष नाहीये. परंतु त्या सात ते आठ तासात त्यांचे हात कुणी बांधले होते?–आ.क्षीरसागर

# आमदार साहेब हे जर खरे असेल तर अटक केलेल्या गुन्ह्यातील आरोपींना क्लीन चीट देणार का?

## गोर गरीबांच्या पोरांना अटक करून त्यांच्या आयुष्याची राखरांगोळी का?

MO.9860898564 अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक – दिपक थोरात

मुंबई: विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरु आहे. मराठा आरक्षण आणि बीडमध्ये घडलेल्या जाळपोळीच्या मुद्द्यावर सभागृहात चर्चा झाली. यावेळी बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी बीडमध्ये घडलेल्या घटनेचा इतिवृत्तांत दिला. ती घटना मराठा आंदोलकांनी केली नाही, अशी भूमिका संदीप क्षीरसागर यांनी मांडली आहे. क्षीरसागरांनी छगन भुजबळ यांनाही एक आवाहन केलं.



आमदार संदीप क्षीरसागर म्हणाले की, बीडमधली जाळपोळीची घटना दुर्दैवी आहे. हल्लेखोरांनी मंदिरसुद्धा फोडली आहेत. माझ्या घरी जाळपोळ झाली, पंडितांच्या घरी दगडफेक केली तिथून बस स्थानकातही दगडफेक केली आणि मग ते निवांतपणे निघून गेले. या घटनेचा मास्टरमाईंड कोण आहे, हे तपासणं गरजेचं आहे.क्षीरसागर पुढे म्हणाले, छगन भुजबळ साहेबांनी घरी भेट दिली, आपले कौटुंबिक संबंध आहेत. परंतु एक आमदार म्हणून प्रामाणिकपणे सांगतो, या घटनेत मराठा समाजाच्या आंदोलकांचा कुणाचाही संबंध नाही. इतर समाजाचाही संबंध नाही. ते गावगुंड होते, ते कुणाशी ना कुणाशी निगडीत होते, यांचे कॉल रेकॉर्ड काढले तर ते कुणाशी बोलत होते ते लक्षात येईल.बीडचा प्रकार पूर्ण महाराष्ट्राने बघितला. त्यानंतर ओबीसी आणि मराठा समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न सुरु झाला आहे. माझं घर जळालं आहे, माझा मुलगा अडचणीत होता. भुजबळांना विनंती आहे की, याच्या खोलापर्यंत गेलं पाहिजे. याचा तपास न्यायालयामार्फत केला पाहिजे.. तशी मागणी केली पाहिजे. माझं घर आणि बीड जेव्हा जळत होतं, त्या सात ते आठ तासात पोलिस प्रशासन तिथं का आलं नाही. एकीकडे मुख्यमंत्र्यांनी खडसेंची तब्येत खराब झाली तर एअर ॲम्ब्युलन्स पाठवली. परंतु माझं घर आणि माझं शहर सात ते आठ तास जळत होतं.. पोलिस मुख्यालय माझ्या घरासमोर होतं.. पोलिसांनी का योग्य कारवाई केली नाही? पोलिसांचाही याच्यात दोष नाहीये. परंतु त्या सात ते आठ तासात त्यांचे हात कुणी बांधले होते?. गृहमंत्र्यांनी याबाबत न्यायालयीन चौकशी लावावी, अशी मागणी संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –८६ | शुक्रवार दि.१५ डिसेंबर २०२३ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४ |
| Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -86 | FRIDAY DT.15 DECEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4 |

# दंगलखोरांना रोखण्यात पोलीस कमी पडले, गृहमंत्री फडणवीस यांची विधानसभेत कबुली

नागपूर : 'मराठा समाजाच्या आंदोलनच्या पार्श्वभूमीवर लोकप्रतिनिधींचे घर जाळणे ही गंभीर घटना आहे. जवळपास सर्वच पक्षांच्या नेत्यांना टार्गेट केले जात आहे. या घटनेकडे राजकारणाच्या पलीकडे बघण्याची गरज आहे. पोलिस यंत्रणा कारवाई करत होते. पोलिसांमुळेच अधिक नुकसान होऊ शकले नाही. मात्र पोलिस यंत्रणा कमी होती हे मान्य आहे, असे उत्तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.मराठा समाजाच्या आरक्षणाच्या निमित्ताने ३० ऑक्टोबर २०२३ रोजी बीड जिल्ह्यातील काही ठिकाणी व बीड शहरात भर दुपारी जाळपोळीच्या घटना घडल्या. जमावधारकांनी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींच्या राहत्या घरावर जीवघेणा हल्ला करून घरं पेटवून देण्याचा प्रकार घडला.

जाळपोळ सुरू असताना पुरेशी सुरक्षा व्यवस्था नव्हती, हा मुद्दा आमदार संदीप क्षीरसागर यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून उपस्थित केला. बीड जिल्ह्यात हा प्रकार झाला हा संपूर्ण महाराष्ट्राने बघितला. ओबीसी आणि मराठा समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. आमदारांच्या घरांवर हल्ले होऊन त्यांची सुरक्षा धोक्यात येते, हा गंभीर मुद्दा आहे. माझे घर ८ तास जळत होते तेव्हा पोलीस कुठे होते, असा सवाल क्षीरसागर यांनी उपस्थित केला. गृहमंत्री यांनी या प्रकरणी न्यायालयीन चौकशी लावावी, अशी मागणी क्षीरसागर यांनी केली.



## एसआयटी स्थापन करणार

एवढा मोठा हल्ला होऊनही इंटेलिजन्स विभागाला कळू नये, यात आश्चर्य आहे. बीडमध्ये काही होणार आहे, अशी माहिती आधीच देण्यात आली होती. त्यामुळे हलगर्जीपणा झाला आहे, यात शंका नाही. पोलिस कमी असतातच. हवेत गोळीबार करून परिस्थिती नियंत्रणात का नाही आणली? असा मुद्दा आमदार जयंत पाटील यांनी उपस्थित केला. पालकमंत्र्यांनी एसआयटीची घोषणा करूनही ती अद्याप स्थापन का केली नाही, असे जयंत पाटील म्हणाले. सराईत गुन्हेगार या मॉबमध्ये सापडले असे पोलिसांचे म्हणणे आहे, मात्र हे आधी लक्षात आले नाही का? असा सवालही पाटील यांनी उपस्थित केला. दोन दिवसांत एसआयटी स्थापन करू, असे आश्वासन फडणवीस यांनी यावेळी दिले.

## पप्पू शिंदे आणि त्या गँगचे लागेबांधे कोणाशी?–जयंती पाटील

बीडच्या पोलीस अधीक्षकांना बीड जिल्ह्यात काहीतरी होऊ शकतं अशी वॉर्निंग होती. त्यांना हे कळवण्यात आलं होतं. त्यामुळे त्यांच्याकडून हलगर्जीपणा झाला. सकाळी माजलगावला जाऊन प्रकाश सोळंकींच्या घराला आग लावली गेली. त्यावेळी तिथे फुटेजमध्ये पोलीस दिसत आहेत. बीड शहर जळत असताना जिल्हा पोलीस अधीक्षक बीडला आले नाहीत. पोलीस कमी होते हे जे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं त्यावर मी हे सांगेन की पोलीस लोकसंख्येच्या तुलनेत कमीच असतात. त्याना जरब बसण्यासाठी हवेत गोळीबार का केला नाही? पोलीस ५० च असतात ५ हजारचा मॉब असला तरीही. पोलिसांनी हवेत गोळीबार करुन जरब का बसवली नाही? राष्ट्रवादी काँग्रेसचं कार्यालय जाळण्यात आलं. जयदत्त क्षीरसागर, सोळंकी यांची घरं जाळली. शहरात जमाव फिरत होता.

नंबर दिले गेलेले होते आणि सगळे फिरत होते. शहरात गर्दीचा जमाव फिरत होते. तरीही विधानसभेच्या सदस्यांना आपण देऊ शकलो नाही तर लोकांची गोष्टच येत नाही. माझा प्रश्न आहे की गोपनीय शाखेला ही माहिती होती. संपूर्ण माहिती होती, मी स्वतः सात ते आठवेळा फोन केला त्यांनी फोन घेतला नाही. संदीप क्षीरसागर यांच्या घरात मुलं आणि त्यांची पत्नी होती. त्यासाठी फोन करत होतो. पालकमंत्र्यांनी एसआयटी स्थापन करण्याची मागणी केली तरीही ती स्थापन झालेली नाही. याचं कारण काय आहे याचं उत्तर देवेंद्र फडणवीस यांनी दिलं पाहिजे. पप्पू शिंदे आणि त्या गँगचे लागेबांधे कोणाशी? असा सवाल जयंती पाटील यांनी विचारला. तर या सर्वांची निपक्षपणे चौकीशी झाली पाहिजे अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

## मुख्य सूत्रधाराचा शोध सुरू

या प्रकरणात २७८ आरोपींना आतापर्यंत अटक करण्यात आली आहे. यातील ३० आरोपी हे सराईत गुन्हेगार आहेत. माजलगावच्या घटनेत ४० गुन्हेगार फरारी आहे. त्यांचा शोध घेणे सुरू आहे. बीडच्या घटनेत ६१ गुन्हेगार सापडले नाही. त्यांचा शोध घेणे सुरू आहे. ज्या आरोपींना पकडले त्यांचे व्हाट्सअप मॅसेजेस, मोबाइल लोकेशन तपासण्यात आले आहे. पुरावा आढळलेल्यांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांची संख्या आणि दंगलखोर यांची संख्या यात मोठा फरक होता. नवीन पोलिस फोर्स पाठवेपर्यंत दंगलखोरांना नियंत्रित करणे कठीण होते. असे हल्ले करणे हे नियोजित आहे का, याचाही शोध घेतला जाईल, याचे मास्टर माइंड कोण आहेत, याचाही शोध घेतला जाईल, असे फडणवीस म्हणाले. गुप्त वार्ता विभागाकडून अशी कुठलीही माहिती मिळाली नव्हती, असेही फडणवीस यांनी सांगितले.



## २२ जानेवारीला सार्वजनिक सुटी जाहीर करा – प्रताप सरनाईक

अखंड हिंदूंचे अराध्य दैवत प्रभू रामचंद्रांचे जन्मस्थान असलेल्या अयोध्येत २२ जानेवारीला मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळा होणार आहे. त्यासाठी देशभरातून लोक अयोध्येला जाणार आहे.लोकभावना लक्षात घेता यादिवशी महाराष्ट्र सरकारने एक दिवसाची सुटी जाहीर करावी, अशी मागणी शिंदे गटाचे आमदार प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी विधानभवन परिसरात प्रसारमाध्यमांशी बोलताना केली.विधिमंडळ परिसरात पत्रकारांशी बोलताना आमदार सरनाईक, म्हणाले, राम जन्मभूमी येथे होणाऱ्या भव्य प्राणप्रतिष्ठापना सोहळयासाठी जगभरातून लोकं येणार आहेत. त्याचा साक्षिदार होण्यासाठी समस्त हिंदू बांधव हे आयोध्याला जाणार आहेत.या दिवसाचे साक्षिदार होण्याची अनेकांची इच्छा आहे. त्यामुळे यादिवशी सार्वजनिक सुटी जाहिर करावी यासाठी आपण, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन सादर केले आहे.वर्षामधली एखादी सार्वजनिक सुटी रद्द करून त्या जागी २२ जानेवारी या दिवशी सुटी जाहीर करावी. अशा पद्धतीने सुट्टी जाहीर केली तर सर्वसामान्यांनी त्याचा फायदा होईल, अशी विनंती मी केले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसह १६ आमदारांच्या राजकीय भवितव्याचा

# फैसला संक्रांती-पूर्वीच होणार!

## राजकीय उत्सुकता शिगेला

नवी दिल्ली : शिवसेना आमदार अपात्रता सुनावणीत मुदत वाढवून देण्याच्या विधिमंडळाच्या मागणीवर सुप्रीम कोर्टाने वेळ वाढवून देण्यात आली आहे. अपात्रता सुनावणीसाठी १० जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ३१ डिसेंबर पूर्वी निर्णय करण्याचे निर्देश विधानसभा अध्यक्षांना देण्यात आले होते.



मात्र निकाल लेखनाला लागणारा वेळ लक्षात घेता वेळ वाढवून द्या, अशी मागणी अध्यक्षांनी केली होती. त्यावर सुप्रीम कोर्टाने तीन आठवड्यांचा वेळ न देता १० जानेवारीपर्यंत मुदत वाढ दिली आहे.

शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणी निकाल देण्याचे राहुल नार्वेकरांच्या वकिलांनी मान्य केले आहे. विधानसभा अध्यक्षांच्या वतीने तुषार मेहता यांनी युक्तिवाद केला आहे. शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणीचा निर्णय १० जानेवारीपर्यंत येईल असे सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या ३१ जानेवारी पर्यंतच्या निर्णयावर कोणतेही भाष्य केलेले नाही. १० जानेवारी किंवा १० जानेवारीच्या आत शिवसेना आमदार अपात्रतेप्रकरणी निर्णय येणार आहे. शिवसेना संदर्भातील निर्णय घेण्यासाठी विधानसभा अध्यक्षांना १० जानेवारी ही डेडलाईन दिली आहे.

# मुख्याधिकारी निता अंधारे यांच्या भ्रष्ट कारभाराची नगरसेवकांनी केली तक्रार

नागरी सुविधा पुरविण्यात अपयशी ठरलेल्या व विभागीय चौकशी सुरू असलेल्या सलीम ट्रेसर व गणेश पगारे या कर्मचाऱ्यांना रुजू करून घेणाऱ्या मुख्याधिकारी निता अंधारे यांच्या गैर कारभाराची चौकशी करून निलंबनाची कार्यवाही करण्याची जिल्हाधिकारी यांचेकडे मागणी





बीड (प्रतिनिधी) १५ डिसेंबर गेल्या गेल्या २४ महिन्यापासून तत्कालीन नगराध्यक्ष व नगरसेवक यांचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने बीड नगर परिषदेचा कारभार प्रशासकाच्या हातात असल्याने सब कुछ राम भरोसे असा प्रकार सुरू आहे , मुख्याधिकारी हेच नगर परिषदेचे सर्व सूत्र सांभाळत आहेत

,बीड नगर परिषदेत मुख्याधिकारी म्हणून निता अंधारे यांची नियुक्ती झाल्यापासून सुरुवातीच्या काळातच स्वच्छता,पाणी आणि विद्युत या मूलभूत सुविधांचा अभाव निर्माण झाला तो आजपर्यंत बीड शहरात कायम आहे मुख्याधिकारी निता अंधारे यांच्या ढिसाळ नियोजनामुळे प्रत्येक प्रभागात नाल्या तुडुंब भरलेल्या आहेत तर रस्त्यावर कचऱ्याचे ढिगारे अस्तव्यस्त जमा होऊन घाणीचे साम्राज्य पसरले असून शहरात सर्वत्र अस्वच्छता पसरली आहे

अस्वच्छतेमुळे कावीळ,कॉलराईड, मलेरिया,टायफर्ड,डेंगू असे गंभीर आजार फोफावले असल्याने शहरातील नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला असून साथ रोगामुळे जीव देखील गमवावा लागणार असल्याची धारणा सर्वसामान्यातून व्यक्त होत आहे,माजलगाव धरणात मुबलक पाण्याचा साठा असताना देखील शहरातील हद्दवाढ भागास २५ दिवस आड पाणीपुरवठा केला जात असल्याने नागरिकांची पाण्यासाठी मोठी भटकंती होत असून तीव्र पाणीटंचाई निर्माण होत आहे,मुख्याधिकारी निता अंधारे यांच्या कार्यकाळात सात वेळा काडीवडगाव येथील पाणीपुरवठा करणाऱ्या विद्युत पंपाचे वीज कर भरणा न केल्याने विद्युत पुरवठा खंडीत केला आहे ही अतिशय खेदजनक बाब आहे

नगर परिषदेचे उत्पन्न वाजवी असून बीड नगर परिषद ही अदर्जाची असल्याने उत्पन्नात कायम वाढ होत आहे मग विद्युत देयक भरण्यास मुख्याधिकारी निता अंधारे यांची असमर्थता का? असे प्रश्न नागरिकांतून उपस्थित होत आहेत

,स्वच्छतेचे कंत्राट देऊन देखील शहरात इतकी अस्वछता कशामुळे आहे मुख्याधिकारी निता अंधारे यांनी आपल्या मर्जीतील कंत्राट दाराला स्वच्छतेचे कंत्राट दिल्यानेच स्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनला आहे,आठवडी बाजाराचे कंत्राट न करता नगर परिषदेच्या काही कर्मचाऱ्याकडून किरकोळ व्यापारी,फळं,भाजी विक्रेते यांचे कडून जबरदस्तीने कर वसूल केला जात आहे याचा पालिकेच्या उत्पन्नावर परिणाम होत आहे मुख्याधिकारी निता अंधारे यांनी नगर परिषदेच्या उत्पनाचे स्रोत वाढवून स्वतःचे आर्थिक हित साधत आहेत

,कोट्यवधी रुपयांचा अपहार केल्याचा ठपका असलेले सलीम ट्रेसर व गणेश पगारे यांचा भ्रष्ट कारभार सर्वश्रुत आहे

पगारे यांच्या कार्यकाळात गोरगरीब सफाई कामगारांना सेवानिवृत्त झाल्या नंतर सेवानिवृत्तीची रक्कम मिळू नये यासाठी वेठीस धरले जात होते त्यांचेकडून अर्थ पूर्ण व्यवहार केल्यासचं सेवा भत्ता दिला जात होता, वैद्यकीय देयकाचे प्रस्ताव जाणीवपूर्वक गहाळ करून संबंधित कर्मचाऱ्यांना व घरकुल लाभार्थ्यांना मानसिक त्रास देण्याचे घोतक पगारे यांनी केले आहे लाड कमिटी च्या निकषावर पळ वाट काढून उपेक्षित सफाई कर्मचाऱ्यांना तुटपुंजे अमिष दाखवून त्यांच्या रिक्त जागा बळकावत धनदांडग्यांना वीस ते पंचवीस लाख रुपयात विक्री करून गडगंज संपत्ती कमावली आहे,

सलीम ट्रेसर यांनी देखील त्यांचे कार्यकाळात बीड शहरातील नागरिकांसह व्यापारी,डॉ,इंजि आदींना अधिकाराचा गैरवापर करून त्रास देऊन त्यांचेकडून लाखो रुपये उखळले आहेत तसेच आज मितीस त्यांचेकडे सहाय्यक नगर रचना काराचा पदभार असल्याने त्यांचे मालिकीच्या निवास्थानी सुमारे दोनशे ते आडीशे गुंठेवारी चे प्रस्ताव असून एक प्रस्तावस नियमबाह्य वीस हजार रुपये आकरले जात आहेत लेखा विभागात लेखाधिकारी कर्तव्यावर असताना तसेच नगर रचना विभागात नगररचनाकार व सहाय्यक रचनाकार असतांना देखील सलीम ट्रेसर व गणेश पगारे यांना नियुक्ती देण्याचा अर्थ स्पष्ट होत आहे

# बीड शहरात शुभम कातांगळे यांच्या माध्यमातून राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसला बळ मिळणार - प्रशांत कदम

## यशवंतराव चव्हाण महाविद्यालय येथे राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या पहिल्या शाखेचे उद्घाटन

बीड (प्रतिनिधी) बीड शहरातील बार्शी रोड वरील यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ पॉलटेक्निक महाविद्यालय येथे राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या आघाडी शाखेचे उद्घाटन प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम यांच्या हस्ते संपन्न झाले.

बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी भरारी घेताना पहावयास मिळत आहे. अत्यंत कमी वेळेत त्यांनी युवकांचे संघटन करून बीड मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष अजित दादा पवार आणि कृषिमंत्री ना.धनंजय मुंडे यांचे हात बळकट करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. अजित दादा पवार यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली व राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे यांच्या नेतृत्वाखाली बार्शी रोड वरील यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी महाविद्यालय येथे राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस च्या पहिल्या शाखेचे मोठ्या थाटामाटात मोठ्या जल्लोषात उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थी काँग्रेस आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम यांच्या हस्ते या शाखेचे उद्घाटन संपन्न झाले.

यावेळी नगरसेवक शुभम युवती जिल्हाध्यक्ष प्रिया डोईफोडे,धूत शुभम कातांगळे रा.वि.काँ. शहर जिल्हाध्यक्ष, अजिंक्य आनेराव रा.वि.काँ. ग्रामीण जिल्हाध्यक्ष, शाकेर जाकेरिया यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी बोलताना प्रशांत कदम म्हणाले की, बीड मतदार संघात राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस आघाडी भविष्यात विद्यार्थ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील राहील. शहरातील प्रत्येक पदाधिकारी का विद्यार्थांना न्याय देण्यासाठी तत्पर असेल. पक्षाचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार आणि कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या मार्गर्शनाखाली तसेच बीड विधानसभेचे अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थी काँग्रेस आघाडी चांगले काम करेल यात तिळमात्र शंका नाही. शहर अध्यक्ष शुभम कातांगळे यांच्या माध्यमातून राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस आघाडी ला बळ मिळेल. आजच्या त्यांचे संघटन



कौशल्य पाहून विद्यार्थी काँग्रेस आघाडी ला भविष्यात विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवून न्याय देण्याचं काम नक्कीच करतील असा विश्वास व्यक्त करत यासाठी त्यांना पक्षाच्या माध्यमातून ताकद देण्याचे काम करू असे सांगितले.

याप्रसंगी आमेर सिद्दीकी, अमर विद्यागर, माजेद कुरेशी, साजेद जहागीरदार, गजानन जवकर, आबा गुजर, भागवत बादाडे, विशाल वाघमारे ईश्वर धनवे, शहादेव वंजारे, गोरख काळे, आकाश झुनभुरे, राजेंद्र कुसळकर मेघराज जगदाळे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

### राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहील - शुभम कातांगळे

आज आम्ही राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस आघाडीची शाखेचे उद्घाटन केले असून पक्षाचे अध्यक्ष अजित दादा पवार, ना.धनंजय मुंडे, प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम यांच्या मार्गदर्शनाखाली, बीड विधानसभेचे अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली बीड मतदार संघात मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांचे संघटन करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी या आघाडीच्या माध्यमातून काम करणार आहोत. शहरातील प्रत्येक महाविद्यालय तसेच वार्डावार्डात विद्यार्थ्यांचे संघटन करून विद्यार्थी काँग्रेस आघाडी ची ताकद वाढविणार आहे. त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील राहील.विद्यार्थ्यांच्या प्रत्येक अडचणीच्या काळात त्यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी काम करणार असल्याचे शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे यांनी यावेळी सांगितले.

# इंद्रायणीची सव्वासातशे वर्षानंतर देखील दिव्यत्वाची प्रचिती !

## अवघ्या नवू वर्षाच्या मुलाचा नवू हजार ओव्याचा ज्ञानेश्वरी ग्रंथ मुखोद्गत !

### फक्त ज्ञानेश्वरीचाच प्रचार व प्रसार करण्यासाठी सर्वस्व समर्पित करणार !

वय कोवळ असले तरी विचाराची प्रगल्भता सोहंम् ने लोकमतचे पत्रकार विजयकुमार गाडेकर यांचेशी बोलतांना दाखवून दिली ,आपण ज्ञानेश्वरीचाच प्रचार व प्रसार करण्यासाठी आपण सर्वस्व समर्पित करणार असल्याचे सोहंमने सांगितले .

### आजोबा , आई ,वडीलांची पुण्याई फलद्रुप ! ज्ञानेश्वरीसाठी जिवन समर्पीत करण्याचा संकल्प !

**शिरूर कासार(प्रशांत बाफना) : सव्वासातशे वर्ष होऊन गेले तरी आजही ईंद्रायणीच्या दिव्यत्वाची प्रचिती वारंवार दिसून येते अशीच नवलाईची गोष्ट सध्या एका अवघ्या नवू वर्षाच्या मुलाबाबत घडली आहे ,वयाच्या पांचव्या वर्षी अक्षर ओळख नसतांना वडीलाच्या तोंडून ज्ञानेश्वरीच्या ओव्या कर्णद्वारात प्रवेश करून त्या स्थिर होत होत वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी नवू हजार ओव्याचा ज्ञानेश्वरी ग्रंथ मुखोद्गत होणे ही देखील एक दिव्यत्वाची प्रचितीच म्हणावी लागेल .**

आजोबा व आई वडीलाची पुण्याई फलद्रुप झालेल्या ज्ञानेशअंश स्वरूप असलेल्या मुलाने आपण आपले सर्वस्व ज्ञानेश्वरीसाठीच समर्पीत करणार असल्याचा संकल्प केला आहे .

सोहंम पुंजाराम अमझरे या मुलाचा जन्म मार्च २०१४ मधे श्रीक्षेत्र आळंदी येथे परंपरेने वारकरी घराण्यात झाला ,आजोबा भजन करणारे असल्याने घरात सांप्रदायीक प्रसंन्नता तर पुढे वडील पुंजाराम अमझरे हे मृदंग वादक म्हणून परिचीत शिवाय मृदंग कला साधनेबरोबर तुळशिच्या माळा बनवणारे आळंदीत पहिले मानले जातात ,शिवाय



सोहंमची आई सिमा अमझरे यांनी एका विश्वासाने गर्भसंस्कार म्हणून बाळ गर्भात असतांना ज्ञानेश्वरीचे एकशेआठ पारायण केले या सर्वांचा परिपाक आणि ज्ञानेश्वर माऊलीचा कृपाप्रसाद म्हणून सोहंम सारखे बाळ यांना प्राप्त झाले .

कोवळे वय ,निरागस आणि पारमार्थिक तेज त्यात ज्ञानेश्वरी सारखा ग्रंथ कंठस्थ झाल्याने सोहंम चे वारकरी सांप्रदायाच्या पितृस्थानी असलेल्या व जोग महाराज यांनी स्थापन केलेल्या वारकरी शिक्षण संस्थेत शांतीब्रम्ह मारूती बाबांच्या हस्ते सत्कार केला गेला तसेच श्रीक्षेत्र भगवान गडचे महंत डॉ न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री यांनी देखील अशिर्वाद दिले ,दिग्गज किर्तनकार चैतन्यमहाराज देगलूरकर ,रामभाऊ महाराज राऊत अशा अनेक महावैष्णवाकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे .

### आपण फक्त निमित्तमात्र !

सोहंम सारखा मुलगा आम्हाला निव्वळ प्रसाद म्हणून मिळाला आहे ,मी फक्त त्याचेवर गर्मसंस्कार व्हावेत यासाठी मनोभावे एकशेआठ पारायण केले ,आणि त्याची फलश्रूती म्हणून शेवटच्या पारायण सांगतेला आमच्या पाळण्यात सोहंमसारखे बाळ माऊलीने दिले असल्याची शुध्द भावना सोहंमची आई सिमा अनझरे यांनी व्यक्त केली .त्याला माऊलीच सांभाळतील असा विश्वास देखील व्यक्त केला.

### हा चमत्कार फक्त माऊलीचाच !

एरव्ही उच्च शिक्षीतांना सुध्दा ज्ञानेश्वरी वाचतांना जड जाते मात्र सोहमला नवव्या वर्षी ग्रंथ कंठसथ होणे हा चमत्कार फक्त माऊलीचाच असल्याचे सोहंम चे वडील पुंजाराम अमझरे यांनी सांगितले .



# छावा क्रांतिवीर सेनेच्या आंदोलनाची पूर्वसंध्येला उपजिल्हा रुग्णालय गेवराई यांच्याकडून दखल

## लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित

गेवराई (प्रतिनिधी.) येथील उपजिल्हा रुग्णालय येथे अनेक दिवसापासून एक्सरे मशीन बंद आहे,त्यामुळे अक्सिजेंड झालेल्या रुग्णांना या ठिकाणी एक्सरे काढण्याची सुविधा बंद आहे.त्यामुळे त्यांना त्यासाठी बीडला किंव्हा खाजगी रुग्णालयात जावे लागत आहे.

तसेच येथील सोनोग्राफी मशीन देखील अनेक दिवसापासून बंद असून याठिकाणी सर्व सामान्य जनतेला सोनोग्राफी साठी खाजगी रुग्णालयात जावे लागत आहे.तसेच गेवराई येथील उप जिल्हा रुग्णालयात रुग्ण गेल्यानंतर अनेक वेळा येथे औषध उपलब्ध नसतात.व अनेक वेळा डॉक्टर देखील उपलब्ध नसतात.तरी येथील औषध जास्त प्रमाणात देण्यात यावे.व जे डॉक्ट्र हजार नसतात त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी.तसेच या रुग्णालयात नवजात जन्माला आलेली बालक ज्या वर्डात ऍडमिट असतात.त्याच वार्डात व्हायरल इन्स्पेक्शनचे रुग्ण देखील ऍडमिट असतात.त्यामुळे त्यांना वेगवेगळ्या वार्डात ऍडमिट करण्याची सोय तात्काळ करावी.

व रुग्णालयात स्वच्छ्ता नसते त्यामुळे रुग्णाला याचा त्रास होत असतो तरी रुग्णालयात स्वच्छ्ता नेहमी ठेवण्याचे आदेश देण्यात यावेत.आपण खालील सुविधा तात्काळ सुरू कराव्यात.

१)एक्स-रे मशीन तात्काळ सुरू करावी २) सोनोग्राफी मशीन तात्काळ सुरू करावी. ३) औषध पुरवठा जास्त प्रमाणात करण्यात यावा. ४) जे डॉक्टर वेळेवर हजर नसतात त्यांची चौकशी करून कारवाई करावी. ५) रुग्णालय रोज स्वच्छ करावे. ६) तसेच गेवराई तालुक्यातील सर्व सरकारी व खाजगी रुग्णालयात रुग्ण हक्काची सनद तात्काळ लावण्यात यावी.अन्यथा १४/१२/२०२३ वार- गुरूवार रोजी छावा क्रांतिवीर सेनेकडून उपजिल्हा रुग्णालय गेवराई येथे धरणे आंदोलन सुरू करण्यात येईल व वरील सुविधा जोपर्यंत सुरू होत नाहीत तोपर्यंत आंदोलनात सुरू ठेवण्यात येईल.असे निवेदन दिले होते.आज दिनांक१३/१२/२०२३ बुधवार रोजी उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाने लेखी आश्वासन देत सर्व मागण्या मान्य करून लवकरात लवकर पूर्ण करू असे आश्वासन दिले.त्यामुळे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले. दिलेल्या वेळेत सर्व मागण्या पूर्ण झाल्या नाही तर परत छावा क्रांतिवीर सेनेकडून आंदोलन करण्यात येईल असे असे जिल्हा प्रमुख राहुल चाळक यांनी सांगितले. यावेळी डॉक्टर नाजिया मॅडम,प्रकाश सानप, विलास गव्हाणे, विलास पवार, आर आर गव्हाणे,छावा जिल्हा अध्यक्ष राहुल चाळक,छावा जिल्हा सरचिटणीस मुक्ताराम मोटे, मुखिद सय्यद मुस्लिम आघाडी तालुका अध्यक्ष गेवराई हे उपस्थित होते.

# श्री क्षेत्र मत्स्येंद्रनाथगड येथे मुर्ती प्राणप्रतिष्ठा कलशारोहन सोहळ्याचे आयोजन भाविक भक्तांनी लाभ घ्यावा-ह भ प स्वामी जनार्दन महाराज

शिरुरकासार(प्रशांत बाफना)शिरूर कासार तालुक्यातील सर्व भाविक भक्तांना कळविण्यात आनंद होत आहे की श्री क्षेत्र मत्स्येंद्रनाथगड निंमगाव मायंबा येथे वैकुंठवाशी धोंडीराम महाराज स्वानंद सुखनिवाशी गुरूवर्य ब्रम्हलिन संत स्वामी निगमानंद महाराज कृपा आशिर्वादाने व स्वामी जनार्दन महाराज गुरू निगमानंद महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री रुक्मिणी



पांडुरंग श्री नर्मदेश्वर नंदी,पार्वती गणपती श्री संत गोरोबा काका,संत धोंडीराम महाराज, संत महादेव महाराज नारायणगडकर,संत सेवालाल महाराज यांच्या मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलाशारोहन सोहळा संत महंत व भाविक भक्तांच्या उपस्थितीत आणि ब्रम्हवृंदांच्या मंत्रघोषात सोहळा संपन्न होत आहे दिनांक १७ डिसेंबर रोजी सकाळी १० ते ११ यावेळेत महंत स्वामी जनार्दन महाराज गुरू निगमानंद महाराज व श्री क्षेत्र नारायणगडाचे मठाधिपती प्रेममुर्ती शिवाजी महाराज यांच्या शुभहस्ते मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलाशारोहन कार्यक्रम संपन्न होईल तदनंतर ११ ते १ यावेळेत श्री क्षेत्र नारायणगडाचे मठाधिपती प्रेममुर्ती शिवाजी महाराज यांचे हरिकिर्तन होईल त्याप्रसंगी सर्व संत महंत भविक भक्तांनी उपस्थितीत राहुन कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे नम्र आवाहन श्री क्षेत्र मत्स्येंद्रनाथगडाचे मठाधिपती ह भ प स्वामी जनार्दन महाराज गुरू निगमानंद महाराज यांनी केले

# पिंपळनेर जिल्हा परिषद गटात लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त आरोग्य तपासणी शिबीरात ५५७ रूग्णांची तपासणी संपन्न-रामदास नाना बडे





मानुर-(प्रतिनिधी)शिरूर कासार तालुक्यात लोकनेते तथा देशाचे माजी केंद्रीय ग्रामविकासमंत्री स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त पिंपळनेर जिल्हा परिषद गटात जिल्हा परिषद सदस्य रामदास नाना बडे यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य तपासणी शिबीर संपन्न झाले. त्यामध्ये -हदयविकार ,त्वचारोग,ब्लडप्रेशर,दंतचिकीत्सा सांधेवात,इत्यादी तपासण्या करण्यात आल्या यामुळे रूग्णात चैतन्य निर्माण झाले असून जिल्हा परिषद सदस्य रामदास नाना बडे यांनी लोकनेत्याची आगळी वेगळी जयंती साजरी करून त्यांच्या प्रति असलेली आपुलकी दाखवून दिली आहे सदरील शिबीर डाक्टर स्वप्निल गर्जे साहेब ,डाक्टर सौ शुभांगी गर्जे यांच्या टिमने विशेष परिश्रम घेऊन आरोग्य शिबीर यशस्वी केले तसेच सर्व रूग्णांना विविध प्रकारचे मेडीसेन मोफत वाटप करण्यात आले लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त आरोग्य शिबीर घेतल्याने पिंपळनेर जिल्हा परिषद गटातील तमाम जनतेसह लोकनेत्या माजी मंत्री पंकजाताई मुंडे, खासदार प्रितमताई मुंडे यांनी अभ्यासू कार्यतत्पर जिल्हा परिषद सदस्य रामदास नाना बडे यांचे विशेष कौतूक केले आहे

# कांदा प्रश्नी अंजनवती येथील शेतकरी आक्रमक

दुष्काळी परिस्थिती त्यातच अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे बीड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात कांदा पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे त्यातच केंद्र शासनाने कांदा निर्यातबंदी घोषित केल्यामुळे शेतकरी अधिकच अडचणीत सापडला असून कांद्याचे भाव घसरल्यामुळे उत्पादन व झालेला खर्च याचा ताळमेळ लागत नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे त्याचबरोबर पेट्रोल व डिझेलमध्ये इथेनॉलचे मिश्रण करता येणार नाही त्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी सुद्धा अडचणीत येणार असून दुधाचे दर अचानक घसरल्याने शेतकऱ्यांचा मुख्य जोडधंदा म्हणून ओळखला जाणारा दुग्ध व्यवसाय कोलमडून पडण्याची स्थिती निर्माण झाली आहे त्यामुळे माननीय मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांनी तात्काळ केंद्रीय कृषिमंत्र्यांची भेट घेऊन कांद्यावरील निर्यात बंदी उठवावी, पेट्रोल व डिझेल मधे इथेनॉल न मिसळण्याचा निर्णय त्वरित मागे घेऊन दुधाला प्रति लिटर पन्नास रुपये भाव देण्यात यावा या मागण्यांसाठी अंजनवती येथुन भाजपा किसान मोर्चाचे माजी बीड तालुकाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांच्या नेतृत्वाखाली वरील मागण्यासाठी एल्गार पुकारला असून मागण्या मान्य न झाल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे याप्रसंगी कृष्णा शिंदे, गोरख येडे, कल्याणराव येडे, नारायण पांचाळ, रामभाऊ येडे, अण्णा कारभारी,बाबुतात्या येडे, दादाराव येडे, भिमराव काटवटे, प्रल्हाद सोनवणे,मनोहर मोरे, साहेबखॉ पठाण,सुरेश मोरे, शेषेराव पाटील, भगवानभाऊ

येडे, राजाराम थोरात, हरेकृष्ण काका,तुकाराम मोरे, बन्सीधर शिंदे, अंकुश चाळक, गोविंद भूमकर आदींची उपस्थिती होती



# आदर्श देवगाव येथे खंडोबा यात्रा महोत्सवाचे आयोजन

वडवणी/ प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव या ठिकाणी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी खंडोबा यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे ,तरी या निमित्ताने कार्यक्रम ची रुपरेषा... दि.१८/१२/२०२३ वार. सोमवार या दिवशी सकाळी ठिक. ८. वाजता खंडोबा लग्न समारंभ व तळी भंडाराचा कार्यक्रम होईल तसेच दुपारी ३ वाजता पारंपरिक पद्धतीने नुसार गाड्या ओढण्याचा कार्यक्रम होईल तसेच दि१९/१२/२०२३ वार मंगळवार या दिवशी दुपारी १ते ४ या वेळेत जंगी कुस्त्यांचा कार्यक्रम होईल, तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी कार्यक्रमाला उपस्थित राहावे.

# धनुर्विद्या स्पर्धेत आष्टीच्या वैष्णवी कुलकर्णीची नॅशनल चॅम्पियन म्हणून निवड

बीड/प्रतिनिधी

जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील सुरडी या गावची वैष्णवी महेश कुलकर्णी या विद्यार्थिनीची धनुर्विद्या स्पर्धेत नॅशनल चॅम्पियन म्हणून निवड झाली आहे तिच्या या यशाबद्दल बीड जिल्ह्यातून कौतुक केले जात आहे, सुरडी येथील पोलीस निरीक्षक महेश कुलकर्णी यांची ती कन्या आहे

बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील सुरडी या गावची कन्या कुमारी वैष्णवी महेश कुलकर्णी ही सध्या नाशिक येथे शिकत असून तिने नडियाद गुजरात येथे झालेल्या स्कूल फेडरेशन ऑफ इंडिया च्या अंडर फोर्टीन राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धे मध्ये महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करून प्रथम क्रमांक पटकावून नॅशनल चॅम्पियन होण्याचा मान मिळवला आहे या संपूर्ण स्पर्धेमध्ये तिने दोन गोल्ड दोन सिल्वर एक ब्रॉंझ मेडल अशी एकूण पाच



पदकांची कमाई केली आहे,वैष्णवी ही बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील सुरडी येथील रहिवाशी व नाशिक येथील पोलीस निरीक्षक महेश कुलकर्णी यांची कन्या आहे तिच्या या यशाबद्दल बीड जिल्ह्यातून सर्वत्र कौतुक केले जात आहे



बीड -भाजपा अल्पसंख्यक मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस(महामंत्री) पदी सलीम भाई जहाँगीर यांची निवड झाल्याबद्दल शुभेच्छा देताना फहीम इनामदार, फेरोज पटेल, रियाज सिद्दीकी, पोलिस बॉईज असोसिएशन चे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष रविंद्र शिनगारे.



# ह.टिपु सुलतान जयंती निमित्त रक्तदान शिबीर व फळवाटप कार्यक्रम संपन्न

गेवराई (प्रतिनिधी) स्वतंत्र सैनिक हज़रत टिपु सुलतान यांच्या २७३ व्या जयंती निर्मित्त रक्तदान हेच श्रेष्ठदान या हेतुने उपजिल्हा रुग्नालय गेवराई येथे दि.१३ बुधवार रोजी सकाळी ११ वा. रक्तदान शिबीर व फळवाटप कार्यक्रम संपन्न झाले. ९३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी

मा.जि.प.अध्यक्ष विजयसिंह राजे पंडित, भाजपा युवा नेते शिवराज दादा पवार, सय्यद एजाज , किशोर कांडेकर,बाळासाहेब सानप,शेख खाजा मामु,सरवर खान,याहिया खान,धम्मापाल कांडेकर,राजेंद्र मोटे, श्रीनिवास बेदरे,सलीम शेख,शेख हाशम भाई,मुस्ताक कुरेशी,शेख खलील, सय्यद राजु,मजहर बागवान,पत्रकार शेख हारून, पत्रकार शेख इर्शाद, ह. टिपू सुलतान युवा मंच जिल्हाध्यक्ष शेख अमजद ,युवा सेना शहर प्रमुख शेख शहेदाद ,शाहरुख पठाण, राजु सेठ, सय्यद निहाल (दादा), वसीम अत्तार,शाहेद बागवान,सय्यद मोहसीन,सय्यद वसीम,शेख इम्रान,सय्यद इम्रान, फेरोज पठाण, शेख जावेद,शाहरुख राज, अरबाज पठाण, सय्यद सोनु,शेख अलीम व आदि उपस्थित होते.

# वृद्धांना न सांभाळणाऱ्या मुलांना नातेसंबंधाचे प्रमाणपत्र नाही

## आई-वडिलांचा सांभाळ केला जातो की नाही याची तपासणी करणार ग्रामपंचायत

धारूर / प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील आसरडोह गावात मागील दीड वर्षापासून मानवलोक संस्थेकडून वृद्धांसाठीसाठी कम्युनिटी किचन उपक्रम राबवला जात असून ज्या वृद्धांना त्यांची मुले सांभाळत नाहीत अशा वृद्धांना दोन वेळच्या जेवणाची सोय करण्यात येत आहे. या उपक्रमात सध्या १५ वृद्धांचा समावेश आहे. यासाठी ग्रामपंचायतीला १० टक्के लोक वाटा भरावा लागत आहे. गावातील अशा वृद्धांची संख्या १५ वरून २५ वर गेल्याने गावच्या सरपंचांना दहा टक्के लोकवाटा देताना अडचणी येऊ लागल्याने ही संख्या कमी व्हावी म्हणून गावातील महिला सरपंचाने पुढाकार घेत ग्रामसभेत आता



गावातील जी मुले आपल्या वृद्ध आई-वडिलांना सांभाळत नाहीत त्यांना नातेसंबंध प्रमाणपत्र न देण्याचा ठराव मंजूर करत ऐतिहासिक निर्णय घेतला असून ग्रामस्थांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.

धारूर तालुक्यातील आसरडोह हे चार हजार लोकसंख्येचे गाव असून या गावात वृद्ध आई-वडिलांचा सांभाळ न करणाऱ्या मुलांची संख्या गावात वाढू लागली होती. वृद्धांना निवासाबरोबरच दोन वेळच्या जेवणासाठी चांगलाच संघर्ष करावा लागत होता. परंतु गावात दीड वर्षापासून अंबाजोगाईच्या मानवलोक या संस्थेने कम्युनिटी किचन हा उपक्रम सुरू करत दोन वेळेचे जेवण देण्यास सुरुवात केल्याने वृद्धांना आधार मिळाला. गावात मुलांकडून सांभाळ न करण्यात येणाऱ्या वृद्धांची संख्या आसरडोह गावात १५ च्या आसपास होती. परंतु या संख्येत वाढ होऊन आता ही संख्या २५ वर गेली आहे. त्यामुळे गावातील सरपंचालाच वृद्धांची व्यवस्था करताना दहा टक्के लोकवाटा देताना अडचणी येऊ लागल्या. यावर पर्याय शोधण्यासाठी बुधवारी (१३ डिसेंबर) सकाळी गावामध्ये सरपंच व गावकऱ्यांनी एक ग्रामसभा घेऊन ठरावच मंजूर केला आहे. गावात आई-वडिलांचा सांभाळ न करणाऱ्या मुलांना प्रमाणपत्र देण्यात येऊ नये, असा ठराव ग्रामसभेने घेतला आहे.

### ग्रामसभा घेऊन महिला सरपंचाने घेतला निर्णय

आसरडोह गावामध्ये बुधवारी सकाळी सरपंच मंगल बाबासाहेब देशमुख यांच्याउपस्थितीत ग्रामसभा घेण्यात आली. या ग्रामसभेमध्ये विष्णू दिगंबर शिंदे यांनीवृद्ध आई-वडिलांचा सांभाळ न करणाऱ्या मुलांना नातेसंबंध प्रमाणपत्र देऊ नयेअसा ठराव मांडला. त्यास रवी किरण देशमुख यांनी अनुमोदन दिल्यानंतरसर्वानुमते हा ठराव मंजूर करण्यात आला.

### ग्रामस्थांच्या एकजूटीचा विजय

प्रमाणपत्र देताना मुलांनी आपल्या आई-वडिलांचा सांभाळ केला आहे की नाही हे आसरडोह ग्रामपंचायत तपासणार आहे. ग्रामपंचायतीसह गावकऱ्यांनी मिळून हा एकमुखी निर्णय घेतला आहे. सामाजिक दृष्टिकोनातून ग्रामस्थांच्या एकजुटीतून हा निर्णय घेण्यात आलेला आहे.



# नगरोत्थान योजनेअंतर्गत विकास कामाचे नंदकिशोर मुंदडा यांच्या हस्ते भुमीपुजन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

केज विधानसभा मतदारसंघातील आ. नमिता मुंदडा यांच्या पुढाकारातून अंबाजोगाई शहरातील नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजना व महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत विकास कामाचे भूमिपूजन नंदकिशोर मुंदडा यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. यामध्ये अंबाजोगाई शहरातील वार्ड क्र. ०४ मध्ये शिंदे यांचे घर मुंडे ते खरटमोल यांचे घर, वार्ड क्र. ०४ मध्ये आमले ते हंडीबाग यांचे घर, वार्ड क्र. ०५ मध्ये देशमुख यांचे घर ते बालाघाट नगर, वार्ड क्र. ०५ मध्ये मस्के यांचे घर ते गजानन नगर पाटी, वार्ड क्र. ०५ मध्ये इंगळे यांचे ते पोटभरे यांचे घर, वार्ड क्र. ०६ मध्ये कराड यांचे घर ते एल. आय. सी रोड वार्ड, क्र.०४ मध्ये शिंदे यांचे घर ते गायकवाड यांचे घर, वार्ड क्र. ०६ मध्ये पांचाळ यांचे घर ते अंकम यांचे घर, वार्ड क्र. ०६ मध्ये नामदेव केंद्रे यांचे घर ते उत्तम केंद्रे यांचे घर, वार्ड क्र. ०४ मध्ये डी. पी रोड ते दराडे यांचे घर, वार्ड क्र. ०८ मध्ये मीनाताई ठाकरे चौक ते नागेश मस्के यांचे घर, वार्ड क्र. ०८ मध्ये नागेश मस्के यांचे घर ते जिजामाता चौ, वार्ड क्र. ०४ मध्ये राहुल चीलावार यांचे घर ते मस्के घर, वार्ड क्र. ०४ मध्ये माने ते ढवळे यांचे घर ते पंडित यांचे घर, आदी रस्त्याचे डांबरीकरण व मजबुतीकरण करण्यात येणार आहे. यावेळी माजी उपनगराध्यक्ष पुजारी, प्रशांत आदनाक, संजय गंभीरे, विनोद पोखरकर, बाला पाथरकर, राजकुमार थोरात, माणिक मुंडे, महेश गित्ते, संजय पोखरकर, कृष्णा लोमटे, अशोक मुंडे, संतोष सुरवसे, सयाजी गायकवाड, विवेक जगताप, रमेश देशमुख, दिगंबर देशमुख, सुभाष सुरवसे, दत्ता बिराजदार, राम भाऊ पंडित, आशिष ढवळे, संतोष करपे व इतर मान्यवर मंडळी उपस्थित होते.

# बीडच्या सहकार क्षेत्रात खळबळ

## माजलगावच्या मराठवाडा अर्बन पतसंस्थेच्या आठ संचालकाचे सामूहिक राजीनामे

बीड : बीड जिल्ह्यात पतसंस्था मल्टीस्टेट घोटाळ्याचे जणू काही लोणच पसरल्याचे चित्र निर्माण झाले आहे. पुन्हा एकदा बीडच्या सहकार क्षेत्रात खळबळ उडाली असून माजलगाव येथील मराठवाडा अर्बन पतसंस्थेच्या ८ संचालकांनी सामूहिक राजीनामे दिले आहेत.बीड जिल्ह्यात गेल्या काही दिवसात जिजाऊ माँ साहेब मल्टिस्टेट परिवर्तन मल्टिस्टेट किंवा इतर काही पतसंस्था यामध्ये मोठ्या प्रमाणावर घोटाळे झाले आहेत. या घोटाळ्यांमुळे पतसंस्था बंद झाल्या आहेत. यात मागील महिन्यातच जिल्ह्यातील २० शाखा असलेल्या




साईराम अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटीच्या मुख्य शाखेसह सर्वच शाखा अचानक बंद झाल्याने खळबळ उडाली होती. यानंतर आता माजलगावच्या मराठवाडा अर्बन पतसंस्थेच्या संचालकांनी सामूहिक राजीनामे दिले आहेत.

### प्रशासकाची नेमणूक

मराठवाडा अर्बन पतसंस्थेच्या ८ संचालकांनी राजीनामे दिल्याने याठिकाणी सहाय्यक निंबधकांकडून प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे आता पतसंस्थेच्या ठेवीदारांची धाकधूक वाढली असून आपल्या ठेवी कशा मिळवाव्यात? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

# आज बीडमध्ये सरकारचे विरोधात जाहीर निषेध आंदोलन करण्यात आले -खुर्शीद आलम



प्रतिनिधी -नागपूर

येथे जनहितार्थ आंदोलन करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आ. रोहित दादा पवार आणि आ.संदिप भैय्या क्षीरसागर यांच्यासह आंदोलकांवर - लाठीचार्ज करून पोलिसा मार्फत कारेवाई करणार्या वर खोके बिनडोके सरकारने अमानुषपणे लाठी मार केला आहे, यामध्ये राष्ट्रवादी युवा संघर्ष यात्रा मधील अनेक आंदोलक जखमी झाले आहेत

म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड शहराध्यक्ष मा. सभापती खुर्शीद आलम यांच्या नेतृत्वाखाली बीडमध्ये लाठीमार सरकारच्या विरोधात आज दुपारी जाहीर निषेध बैठक घेऊन महाराष्ट्र सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करून जाहीर निषेध आंदोलन करण्यात आले आहे यावेळी अनेक मान्यवरांची उपस्थिती होती, मा. सभापती खुर्शीद आलम अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बीड शहर

# शेतकऱ्यांचे शेतातच ठिय्या आंदोलन; नुकसान भरपाईची मागणी

गेवराई । प्रतिनिधी

अवकाळी पावसाने नुकसान केलेल्या पिकाचे पंचनामे करून तात्काळ मदत द्यावी; ही प्रमुख मागणी घेऊन बीडच्या सादोळा गावच्या परिसरात शेतकरी आक्रमक झाले आहेत. शेतकऱ्यांनी सादोळा शिवारातील शेतामध्येच ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. मागील महिन्यात राज्यातील अनेक भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. बीड जिल्ह्यात देखील अवकाळी पाऊस झाला होता. या पावसामुळे शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. खरीप हंगामात अपेक्षित उत्पन्न आले नसताना अवकाळीने नुकसान केले आहे. शिवाय खरीप हंगामातील नुकसानीची भरपाई अद्याप मिळाली नसून



आता पुन्हा नुकसानी झालं बसली आहे. यामुळे मदत लवकर मिळावी यासाठी शेतकऱ्यांनी ठिय्या आंदोलन मांडले आहे. अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या पिकांचे तात्काळ पंचनामे करावे. हरभरा पिकाचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक व बियाणांची मदत करावी, शेतकऱ्यांना तात्काळ पिकविम्याची वाटप करावे. या मागण्या घेऊन अखिल भारतीय किसान सभेच्या नेतृत्वाखालील शेतकऱ्यांनी ठिय्या आंदोलन केले. दरम्यान यावेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.





साखर संकुल पुणे येथील ऊसतोड दरा विषयी असणारी बैठक निष्फळ सर्व ऊसतोड मजूर मुकादम वाहतूकदार संघटना व साखर संघ यांच्यातील करार संपुष्टात आलेला आहे त्यामुळे कालची चौथी बैठक निष्फळ या बैठकीसाठी साखर संघाचे अध्यक्ष पि आर पाटील जयप्रकाश दांडेगावकर मा हर्षवर्धन पाटील संचालक मंडळ व सर्व ऊसतोड संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते सर्व संघटना ५०/टक्के वाढीवर ठाम आहेत तर साखर संघ २७/टक्के वाढ देऊ म्हणतात सर्व संघटनांनी दिं २५/१२/२०२३पर्यंत न मिटल्यावर महाराष्ट्र राज्यातील सर्व ऊसतोड मजूर ऊसतोड बंद करून संपावर जातील असा इशारा सर्व संघटनांनी साखर संघाला दिलेला आहे

# तू किस झाड की पत्ती, भुजबळांचे जरांगेंना प्रत्युत्तर:लोकप्रतिनिधींना गावबंदी करणे गुन्हा, एक महिन्याची शिक्षा करण्याचीही मागणी

नाशिक / प्रतिनिधी

माझ्या नादी लागू नये, अन्यथा उरलेले केसही गळतील असे वक्तव्य मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी कालच नाव न घेता छगन भुजबळ यांना उद्देशून केले होते. यावर मंत्री छगन भुजबळ यांनी त्याच शब्दात प्रत्युत्तर दिले आहे. जो कोणी बोलला असेल त्याला म्हणावं, तू काय मी फार मोठे-मोठे लोक अंगावर घेतले आहेत. तू किस झाड की पत्ती है! असं रोखठोक उत्तर छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे पाटील यांना दिले आहे. या दोघांमधील तू-तू, मै-मै अद्याप संपलेली नसल्याचेच यावरुन स्पष्ट होते.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी लोकप्रतिनिधींना गावबंदी करणे हा गुन्हा आहे. त्याला एक महिना शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी छगन भुजबळ यांनी केली. तसेच मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या सरकारला देण्यात आलेल्या इशाऱ्यावर देखील भुजबळांनी टीका केली. या तारखेपर्यंत द्या आणि त्या तारखेपर्यंत द्या म्हणजे ब्लॅकमेलिंग नाही तर आणखी काय आहे? असा सवालही छगन भुजबळ यांनी उपस्थित केला.



राज्यात मराठा आरक्षणासाठी ५८ मोर्चे निघाले, लाखो कार्यकर्ते आणि महिला यात सहभागी झाल्या होत्या. मात्र, राज्यात कुठेही कायदा व्यवस्थेला धक्का लागला नाही. पृथ्वीराज चव्हाणांच्या काळात एक कायदा केला, तो अडचणीत आल्यानंतर फडणवीस मुख्यमंत्री असताना दुसरा कायदा केला, तो हायकोर्टात टीकला पण सर्वोच्च न्यायालयात अडकला. त्यामुळे शांततेत आंदोलन केल्यास सरकार लक्ष देत नाही असा भाग नाही. आताही सरकार काम करतंच असल्याचे भुजबळ यांनी म्हटले आहे.

## घरे कार्यालये, हॉटेल्स ही ठरवून, कट करून पेटवण्यात आल्याचा भुजबळ यांचा आरोप

मराठा समाजाच्या आंदोलनादरम्यान जरांगे यांनी पोलिसांवर हल्ला करणं, पोलिसांना जखमी करणं. बीडमध्ये अनेकांची घरे कार्यालये, हॉटेल्स ही ठरवून, कट करून पेटवण्यात आली, असा आरोप छगन भुजबळ यांनी केला. त्यामध्ये जीवितहानीही झाली असती पण परमेश्वर कृपेने महिला, मुले वाचली असल्याचे ते म्हणाले. राज्यात गावबंदी केली मात्र, ठराविक व्यक्तींना त्यातुन मुक्तता मिळाली असल्याचा आरोप त्यांनी केला. खासदार आमदारांना गावबंदी केली, अशा प्रकारे विरोध करणाऱ्यांना एक महिन्याची शिक्षा आहे. ती झाली पाहिजे अशी मागणीही त्यांनी केली.

# मराठा आंदोलक ऋषिकेश बेद्रेंना जामीन मंजूर!

## मात्र बीड -जालना जिल्ह्यात नो एन्ट्री

अंतरवली सराटे येथील हिंसाचार प्रकरणांमध्ये बीडच्या गेवराई येथील ऋषिकेश बेद्रे यांच्यासह अन्य तिन जणांना अंबड पोलिसांनी अटक केली होती. आज औरंगाबाद हायकोर्टाकडून ऋषिकेश बेद्रे यांना अटी शर्तीवर जामीन देण्यात आला आहे.

यामध्ये ऋषिकेश बेद्रे यांना बीड आणि जालना जिल्ह्यात पुढील ९० दिवस येण्यास बंदी असणार आहे. जर बेंद्रे यांना बीड किंवा जालना जिल्ह्यातील एखाद्या आंदोलनामध्ये सहभाग नोंदवायचा असेल, तर पोलीस प्रशासनाची परवानगी घेऊनच त्यांना यावं लागणार आहे, या अटीवर त्यांना जामीन मंजूर झाला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, मनोज जरांगे पाटील यांचं उपोषण सुरु असताना पोलीस आणि आंदोलकांमध्ये झटापट झाली होती. या संपूर्ण वादग्रस्त प्रकार १ सप्टेंबर २०२३ रोजी घडला हित. याप्रकणातील प्रमुख आरोपी ऋषिकेश बेद्रे यांना पोलिसांनी अटक केली होती.

बेद्रे यांच्यावर दगडफेक केल्याचा आरोप आहे. ते मराठा आंदोलनामध्ये सक्रिय होते. १ सप्टेंबरच्या दुपारी अंतरवाली सराटी गावात पोलिस आणि आंदोलकांमध्ये संघर्ष झाला होता. या संघर्षाचे व्हिडीओ सोशल मीडियात व्हायरल झाले होते. ही घटना घडून गेल्यानंतर मधल्या काळात राजकारण बरंच तापलं होतं. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनाप्रकरणावरुन माफीही मागितली होती. तसंच जालन्याचे तत्कालीन पोलिस अधीक्षक तुषार दोषी यांची बदलीही करण्यात आली होती.याच दरम्यान बेद्रे यांना पोलिसांनी अटक केली होती. त्यांच्याकडे गावठी पिस्तुलही आढळून आली होती, असं सांगण्यात येत आहे. मात्र आता त्यांना न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे.

# आश्रमशाळा कर्मचाऱ्यांचे वेतन अनुदान

## लवकर देण्यास शासन सकारात्मक- मंत्री गुलाबराव पाटील

नागपूर : सामाजिक न्याय विभागाअंतर्गत राज्यातील शाहू, फुले, आंबेडकर निवासी अनुसूचित जाती निवासी, अनिवासी आश्रमशाळेंच्या शिक्षक तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन अनुदान लवकरच देण्याबाबत शासन सकारात्मक असल्याचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी विधानपरिषदेत सांगितले.

राज्यातील शाहू, फुले, आंबेडकर निवासी अनुसूचित जाती निवासी, अनिवासी आश्रमशाळेंविषयी सदस्य विक्रम काळे यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यास उत्तर देताना श्री. पाटील बोलत होते.मंत्री श्री. गुलाबराव पाटील म्हणाले, संस्थाचालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना यांच्यामार्फत या योजनेतील १६५ आश्रमशाळांना कायमस्वरूपी अनुदान मंजूर करून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियमित वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी सातत्याने करण्यात येत होती. त्याअनुषंगाने या आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियमित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये शाहू, फुले, आंबेडकर निवासी, अनिवासी आश्रमशाळांना केंद्र शासनाच्या धर्तीवर मानधन देण्यासाठी लागणारा खर्च तसेच नियमित वेतनश्रेणीसाठी लागणारा खर्च यासंदर्भातील तुलनात्मक आकडेवारी विचारात घेऊन दोन्ही प्रस्ताव शासनास सादर करावेत असे निर्देश दिलेले होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिलेल्या निर्देशानुसार शाहू, फुले, आंबेडकर निवासी, अनिवासी आश्रमशाळांना केंद्र शासनाच्या धर्तीवर मानधन देण्यासाठी लागणारा खर्च तसेच नियमित वेतनश्रेणीसाठी लागणारा खर्च यासंदर्भातील तुलनात्मक आकडेवारीचे वस्तुस्थितीचे अवलोकन करून मंत्रिमंडळासमोर स्वतंत्रपणे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिलेले असल्याचे श्री. पाटील यांनी सांगितले.या आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियमित वेतनश्रेणीसह १०० टक्के अनुदान मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. या योजनेअंतर्गत पात्र शाळांना अनुदान देण्यासाठी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये रू.२५ कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूदही करण्यात आली असल्याचे श्री. पाटील यांनी यावेळी सांगितले.या संदर्भातील प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी वित्त विभागाकडे असून आश्रमशाळा तपासणीच्या अधीन राहून शासनाकडून सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून २०% अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे श्री. पाटील यांनी सांगितले.यावेळी सदस्य सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, किरण सरनाईक, अभिजित वंजारी यांनी चर्चेत सहभाग घेतला होता.

# विरोधी पक्षातील मोजक्याच नेत्यांना निधी

## बाकींच्यांना काहीच नाही, निधी वाटपावरून जितेंद्र आव्हाडांची नाराजी

मुंबई: निधी वाटपाच्या संदर्भात जितेंद्र आव्हाड (गळींशपवीर -हरव) यांनी विरोधी पक्षातील वरिष्ठ नेत्यांवरच नाराजी व्यक्त केली. विरोधी पक्षातील मोजक्या वरिष्ठ नेत्यांनाच निधी मिळाल्याची जितेंद्र आव्हाड यांनी माहिती दिली. विरोधी पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी जर आपल्याच पक्षातील सर्व आमदारांना समसमान निधी वाटप होत नसेल तर तो निधी घेऊ नये, अशी भूमिकाही त्यांनी मांडली आहे

आपल्याच कळपातील काही जणांना निधी मिळते आणि काही जणांना एक रुपया सुद्धा जर निधी मिळत नसेल तर सरकार विरोधात लढाई लढायची कशी? असा जितेंद्र आव्हाड यांनी प्रश्न उपस्थित केला आहे.



अजित पवार यांना विरोधी पक्ष नेते करावे यासाठी जे आमदारांच्या सही असणारे पत्र होते, त्यावर सर्वच आमदारांनी सही केली नव्हती. अजित पवार यांनी काही आमदारांना एका पत्रावर सही करायला लावली आणि ते पत्र अजित पवार यांना विरोधी पक्षनेते करावे यासाठी शरद पवार यांना देण्यात आले. त्या पत्रावर माझी सही नव्हती, त्यामुळे सर्व आमदारांनी पत्रावर सही केली असं म्हणणं उचित नाही, असेही आव्हाड म्हणाले.

अजित पवारांनी पक्षात कोणालाच मोठं होऊ दिले नाही अशी टीका करत जितेंद्र आव्हाड म्हणाले की, मी देखील मला विरोधी पक्षनेते करावे असे एक पत्र शरद पवार यांना दिलं होतं. अजित पवार यांना विरोधी पक्षनेते करावं यासाठी जे काही पत्र दिले, त्यावर केवळ अठरा-एकोणीस लोकांच्या सह्या होत्या. त्या काळात केवळ नऊ जणचं सर्व पदांसाठी हकदार होते. आयुष्यात दुसरी पिढी कधी वरती आलीच नाही. राजकारणात नवीन पिढी आली पाहिजे. शरद पवार नंतर तुम्ही राजकारणात आलात, कारण शरद पवारांनी तुम्हाला आणलं. परंतु, तुम्ही कोणाला राजकारणात आणलं सांगावं, केवळ मी आणि मी हेच तुम्ही केलं. पक्षात माझ्याशिवाय कोणी नाही एवढेच तुम्ही केलं, असा आरोप आव्हाड यांनी केला.

## अजित पवारांवर हल्लाबोल

जितेंद्र आव्हाड यांनी अजित पवार यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. ते म्हणाले की, अजित पवार यांना विरोधी पक्षनेते पद हवे होते. सत्तेत आल्यानंतर देखील सर्व पदं त्यांनाच हवी होती. त्यांच्याच मान्यतेने इतरांना पदं दिली गेली. त्यामुळे, सर्व जे काही करायचं ते अजित न करायचं विश्वास दाखवणे शरद पवार यांची सर्वात मोठी चूक ठरली. उपमुख्यमंत्री केलं, विरोधी पक्षनेते केलं, पक्षात काही निर्णय घ्यायचा आहे तर अजित पवारच घेतील ही बाब सर्वांना माहिती आहे. फक्त कोणी बोलत नाही आणि मी बोलण्याचा धाडस करतो, असे जितेंद्र आव्हाड म्हणाले आहेत.

# पुरवणी अर्थसंकल्पात खा.प्रितमताईंच्या पुढाकारातून मंझरी-करचुंडी रस्त्यावरील पूल बांध कामासाठी १० कोटी मंजूर-राजेंद्र मस्के

बीड, (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्याच्या लोकप्रिय खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या पुढाकारातून बीड विधानसभा मतदार संघातील छक२११ ते मंझरी - करचुंडी ग्राम - ७१ या रस्ता व मोठ्या पूल बांधकामा साठी दहा कोटी रुपयाचा निधी पुरवणी अर्थसंकल्पात मंजूर झाला आहे. यामुळे हा रस्ता व मोठ्या पुलाचे बांधकाम होईल. व ग्रामस्थांना वाहतुकीसाठी चांगला रस्ता मिळेल अशी माहिती भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली.




मंझरी ते करचुंडी हा ग्रामीण रस्ता असून हा रस्ता अत्यंत खराब आहे. खराब रस्ता आणि पुलाअभावी ग्रामस्थांना त्रास सहन करावा लागतो. बरेच दिवसापासून हा रस्ता सुधारण्याच्या प्रतीक्षेत होता. ग्रामस्थांची मागणी लक्षात घेऊन, भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी खा. प्रितमताई मुंडे यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री व सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे मागणी करून निधीचा आग्रह धरला होता. पुरवणी अर्थसंकल्पात या रस्त्याचा समावेश करून सिमेंट रस्ता व मोठा पूल बांधण्यासाठी दहा कोटी रुपयाचा निधी मंजूर केला आहे. लवकरच टेंडर प्रक्रिया पूर्ण होऊन कामाचा शुभारंभ होईल. या रस्ता कामाला मंजुरी मिळाल्यामुळे मंझरी करचुंडी परिसरातील ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करून खा. प्रितमताई व जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांना धन्यवाद दिले आहे. -



श्री गजानन सहकारी सूतगिरणीला शॉर्टसर्किटमुळे आज अचानक आग लागली या आगीत कापसाच्या गठन पेटल्या होत्या स्थानिक प्रशासनाने अग्निशामक दलाच्या चार गाड्या तातडीने मागवल्यामुळे आग आटोक्यात आली आहे या आगीत नेमके किती नुकसान झाले हे अद्याप कळु शकलेले नाही सूतगिरणीचे कर्मचारी अधिकारी सुरक्षित असून या घटनेत कुठलीही जीवितहानी झालेली नाही





बीड ।प्रतिनिधी

खरिप हंगामात झालेला कमी पाऊस आणि त्यामुळे निर्माण झालेली दुष्काळी स्थिती तसेच भुजल पातळीत झालेली घट व संभाव्य पाणी टंचाई यापार्श्वभुमीवर केंद्रीय पथकानी आज बीड जिल्हयात प्रत्यक्ष बांधावर जाऊन पाहणी केली आणि ग्रामस्थ व अधिकारी यांच्याशी चर्चा करुन माहिती घेतली.पथकाने जिल्हयातील बीड, वडवणी धारुर तसेच शिरुर कासार मधील अनेक ठिकाणी भेट दिली.

# आईपासून दुरावलेले गव्हाणी घुबडाची पिल्लू सर्पराज्ञीच्या कुशीत

शिरूर कासार (प्रशांत बाफना): बीड येथे घायाळ अवस्थेत आढळलेल्या,आईपासून दुरावलेल्या दोन घुबडांच्या पिल्लांची सेवा सुश्रुषा सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्रात केली जात आहे . या घुबडांच्या पिल्लांना सर्पराज्ञीच्या कुशीत आईची माया मिळत आहे.

बीड येथील सर्पमित्र सनियंत्रण समितीचे सदस्य सर्पमित्र दयानंद ससाने व प्रदिप भातपुडे यांना घायाळ अवस्थेत गव्हाणी घुबडाचे पिल्लू अग्निशामक दल ऑफिस समोर आढळून आले होते.तर दुसरे गव्हाणी घुबडाचे पिलू दिलीप सुराणा यांना कोटेच्या कॉलनीमध्ये घायाळ अवस्थेत दिसून आले होते. या दोघांनीही घुबडाची पिल्लं स्वतः पकडून सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्राचे संचालक मानद वन्यजीव रक्षक सिद्धार्थ सोनवणे यांना माहिती देऊन त्यांच्याकडे ही घुबडाची पिल्लू दिली.

सध्या या घुबडांवर विभागीय वन अधिकारी अमोल गरकळ यांच्या मार्गदर्शनाखाली सर्पराज्ञीत उपचार सुरू असून हे पिल्लं लवकरच बरी होतील अशी आशा सर्पराज्ञीच्या संचालिका सृष्टी सोनवणे यांनी व्यक्त केली.

या घुबडांचा प्रजनन काल निश्चित असा नसला तरी या महिन्यांमध्ये साधारण बऱ्याच प्रमाणामध्ये या घुबडांची पिल्लं दृष्टीस पडतात त्यामुळे जनतेने अशी पिल्ले जर कोणाच्या नजरेस दृष्टीस पडली तर तात्काळ वन विभागाशी किंवा सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्रासी संपर्क साधावा



जेणेकरून निसर्गाचे हे अनमोल जीव वाचवण्यास आपला हातभार लागेल.

-सिद्धार्थ सोनवणे
(मानद वन्यजीव रक्षक बीड)

# लोकसभेतून १५ खासदारांचे निलंबन

सभागृहातील कामकाजात अडथळा आणल्याचा ठपका ठेवत लोकसभेतील विरोधकांच्या १५ खासदारांचे निलंबन करण्यात आले आहे. लोकसभेच्या कामकाजादरम्यान गदारोळ आणि गैरवर्तवणूक केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. या १५ खासदारांपैकी ५ खासदार हे काँग्रेसचे आहेत.याबाबत अधिक माहिती अशी की, संसदेची सुरक्षा भेदल्याची घटना घडल्यानंतर देशभरात खळबळ उडाली आहे. लोकसभेत खासदार बसलेल्या बाकांवर या तरुणांनी उड्या मारून धुराच्या नळकांड्या फोडल्या. या घटनेनंतर संसदेच्या सुरक्षितेवर प्रश्न चिन्ह उपस्थित करत विरोधकांनी सभागृहात विरोधकांनी मोठा गोंधळही केल्याचे पाहायला मिळाले होते.काल झालेल्या या घटनेवर गंभीर दखल घेत विरोधकांच्या १५ खासदारांचे निलंबन केले आहे. सभापतींनी गोंधळ घालणाऱ्या खासदारांची नावं दिल्यानंतर १५ विरोधी खासदारांना अधिवेशनाच्या उर्वरित कालावधीसाठी निलंबित करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT